# ❖डेव्हिड मिलरने ठोकले सर्वात वेगवान शतक



- दक्षिण आफ्रिकेचा फलंदाज डेव्हिड मिलर याने बांग्लादेश विरूद्धच्या सामन्यात तडाखेबाज खेळी करत **नवा विश्वविक्रम** केला आहे. आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमध्ये सर्वाधिक वेगवान शतक बनवण्याचा विश्वविक्रम मिलरने केला आहे. ३५ चेंडूंमध्ये मिलरने शतक ठोकत क्रिकेटच्या इतिहासात आपले नाव नोंदवले. त्याने या खेळीत ७ चौकार आणि ९ षटकार लगावले. दक्षिण आफ्रिका संघाने मिलरच्या खेळीच्या जोरावर २० षटकामध्ये २२४ धावांचा डोंगर उभार केला.
- मात्र मोठ्या धावसंख्येचा पाठलाग करण्यासाठी मैदानात उतरलेला बांग्लादेश संघ १४१ धावांमध्ये बाद झाला. दक्षिण आफ्रिका संघाने हा सामना ८३ धावांनी जिंकला. डेव्हिड मिलरच्या अगोदर टी-२० सामन्यात सर्वात वेगवान शतकाची नोंद लेवी या दक्षिण आफ्रिकेच्याच फलंदाजाच्याच नावे होता. २०१२ मध्ये जिम्बाब्वेच्या विरूद्ध खेळताना लेवीने ४५ चेंडूत शतक बनवले होते. फाफ डू प्लेसिस वेगवान शतक बनवण्याच्या यादीत तीसऱ्या क्रमांकावर आहे. त्याने ४६ चेंडूत आपले शतक बनवले आहे. भारताचा केएल राहुल चौथ्या क्रमांकावर आहे. २०१६ मध्ये वेस्टइंडीज विरूद्धच्या सामन्यात राहुलने ४६ चेंडूत शतक बनवले आहे. मिलरने आपले वेगवान शतक बनवताना बांगलादेशचा गोलंदाज मोहम्मद सैफुद्दीन याच्या एकाच षटकात ५ षटकार ठोकले.
- **४० चेंडूंच्या आत दोन शतके मिलरने टी-२० मध्ये झळकवली आहेत**. तो असे करणारा पहिला खेळाडू बनला आहे. यातील एक शतक त्याने आयपीएलमध्ये बनवले आहे. मिलरने २०१३ मध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळूरू विरूद्धच्या सामन्यात फक्त ३८ चेंडूमध्ये शतक बनवले होते. **आयपीएलमध्ये फक्त ३० चेंडूत शतक बनवण्याच्या विक्रमाची क्रिस गेलच्या नावावर नोंद आहे.**

E-mail: contact@youngias.com www.youngias.com Mob: 9029098746
enquiry.aashah@gmail.com 9004418746